# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : ०४/०९/२०२४

## प्रेसनोट

महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाकडून सणांचे पर्यावरणपुरक साजरीकरण करणेच्या अनुषंगाने नागरीकांमध्ये जनजागृती करण्याबाबत निर्देश प्राप्त झाले आहेत. त्या अनुषंगाने मा. आयुक्त तथा प्रशासक, विकास ढाकणे, अतिरिक्त आयुक्त, जमीर लेंगरेकर तसेच उपायुक्त, डॉ. सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनानुसार श्रीम. विशाखा सावंत, पर्यावरण विभागप्रमुख यांनी पर्यावरणपुरक गणेश सजावट (घरगुती व सार्वजनिक गणेश उत्सव मंडळांकरीता ) स्पर्धेचे नियोजन केले आहे. घरगुती गणेश सजावट स्पर्धेतील एकुण रु.१,००,०००/- तसेच सार्व. गणेश उत्सव मंडळांकरीता एकुण रू.१,००,०००/- अशी रोख रक्कम विजेत्यांना विभागुन देण्यात येणार आहे. सदर स्पर्धेचे निकष पुढीलप्रमाणे आहेत. शाडु/ लाल माती तसेच पर्यावरणपुरक साहित्यापासुन तयार केलेल्या मुर्तीची प्रतिष्ठापना करावी. सजावट/आरासीसाठी थर्माकोल किंवा प्लास्टीकच्या साहित्यांचा वापर करू नये. मुर्ती विसर्जन घरच्या घरी किंवा महापालिकेच्या कृत्रिम तलावातच करावे. ध्वनी प्रदुषण होणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच मातीच्या मुर्ती विसर्जनानंतर शिल्लक राहिलेली माती पुर्नवापराकरीता महापालिकेच्या प्रभाग कार्यालय किंवा पर्यावरण विभागाकडे जमा करावी.

पर्यावरणपुरक गणेश सजावट ( घरगुती व सार्वजनिक गणेश उत्सव मंडळांकरीता ) स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी नागरीकांनी QRकोड स्कॅन करुन किंवा www.umcmajhivasundhara.in या लिंकवर नोंदणी करणे आवश्यक आहे. सदर स्पर्धेमध्ये सहभागी होणेसाठी दिनांक ६ सप्टेंबर. २०२४ रोजीपर्यंत नोंदणी करता येणार आहे.

पर्यावरणपुरक गणेश सजावट स्पर्धेच्या QRकोड व लिंकचे अनावरण मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. विकास ढाकणे यांच्याहस्ते सिंधुभवन, उल्हासनगर-२ याठिकाणी आयोजित कार्यक्रमात दिनांक ०३ सप्टेंबर, २०२४ रोजी करण्यात आले आहे.

उल्हासनगर शहरातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, पर्यावरणपुरक गणेश सजावट स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी वर दिलेल्या लिंकवर जाऊन नोंदणी करावी. तसेच वर्षभरातील सर्व सण, उत्सव पर्यावरणपुरक साजरे करून उल्हासनगर शहर स्वच्छ, सुंदर व प्रदुषणमुक्त करणेस सहकार्य करावे.

४/९/२४

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका
प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका

सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करवी.